पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक :नस/९/कावि/१४०२/०९
दिनांक : १०/१२/२००९

प्रति,

मा..................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक १८/१२/२००९ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १८/१२/२००९ रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

## मा. विधी समिति

## कार्यपत्रिका क्रमांक : १२

दिनांक : १८/१२/२००९ वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक १८/१२/२००९ रोजी दुपारी २ :०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक ४/१२/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक : १) श्री.पाटील शशिकांत रामदास यांना प्राचार्य पदावर पे बॅंड १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० मध्ये नेमणुक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.१८.१२.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक : २) स्थापत्य विभागाकडील "असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर"पदाची आवश्यकता विचारात घेता ,महापालिका आस्थापनेवरील सदर पदाची - "वेतनश्रेणी : र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ५४०० भरतीप्रमाण : १००% सरळसेवेने शैक्षणिक अर्हता : १) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी B.E. [civil] २) महापालिकेतील अभियांत्रिकी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव ३) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरींग मधील पदवीव्युत्तर पदवी असणे आवश्यक ४) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील कामाचा अनुभव असणे आवश्यक", याप्रमाणे वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक : ३) श्री.संजय श्रीरंग विभुते - मजुर यांना वर्तनात सुधारणा करण्याची संधी देउनही त्यांच्या वर्तनात न झालेली सुधारणा, खातेनिहाय चौकशीमध्ये त्यांचेवर सिध्द झालेले दोषारोप, अंतिम नोटीसचा त्यांनी सादर न केलेला खुलासा, चौकशीनंतरही त्यांची १३७ दिवस गैरहजेरी या सर्व बाबी नुसार सन १९९२ ते ऑक्टोबर २००९ या कालावधीतील त्यांची एकुण गैरहजेरी तीन वर्ष १० महिने एवढी असल्याने त्यांची एकुण २० वर्षाची सेवा विचारात घेता त्यांना सक्तीने सेवानिवृत्त करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक : ४) प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा धोरण २००९ प्रमाणे जकात नियम २००१ चे अनुसूची २ मध्ये तरतुद करणेस व यास नागरिकांच्या हरकत / सूचना मागविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/ १४०२ /०९
दिनांक : १०/१२/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.